## झेड. पी. चे शिलेदार


सावकार मादनाईक


सौ. निता परीट


सौ. सीमा पाटील


सौ. सुनंदा दानोळे


सुरेश कांबळे

## जि. प. चे शिलेदार


श्रीमती अनंतमती पाटील


सौ. अनिता माने


सौ. शिला पाटील


सौ. सुवर्णा अपराज


सौ. वैशाली देवताळे


वसंत हजारे


कमरूद्दीन पटेल


युनूस पटेल

स्वाभिमानी विचार प्रति, Book-Post

RNI No. - MAH/MAR/2005/16213 Rgd. No.L2/17/RNP/K.L.P/234/12-14

वर्ष ७ | अंक ६ | १५ फेब्रुवारी २०१२ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

सा. रे. पाटील व यड्रावकरांना खुर्दा

### शिरोळ तालुक्यात स्वाभिमानीच

पान ४ वर ▶

## अखेर शेत नांगरलेच !


आलास : जिल्हा परिषद मतदारसंघातील सुनंदा दानोळे विजयी झाल्या. त्यांना समर्थकांनी असे उचलून घेतले. बातमी पान ७ वर ▶



# मायक्रो बँकिंगचे कार्य गरिबांचे संसार फुलवणारे

## खासदार राजू शेट्टी : 'सांगली अर्बन'तर्फे बचत गट मेळावा


सांगली : सांगली अर्बन बँकेचे मायक्रो बँकिंगचे कार्य गोरगरिबांचे संसार फुलवणारे असल्याचे मत खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. एकात्म समाज सेवा केंद्राच्या माध्यमातून बँकेने कुपवाड, यशवंतनगर, अहिल्यानगर, गणेशनगर परिसरातील महिला बचत गटांना कर्जपुरवठा केला आहे. या महिलांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रमोद पुजारी यांनी नाबार्डच्या पाच महिला व पाच शेतकऱ्यांच्या संयुक्त जबाबदारी गट (जॉईंट लायबिलीटी ग्रुप) योजनेअंतर्गत वित्तपुरवठा करण्यासाठी जिल्ह्याला दोन कोटी रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती दिली. बँकेचे मार्गदर्शक बापूसाहेब पुजारी यावेळी उपस्थित होते.

श्री. पुजारी म्हणाले,'' बँकेने मिरज शाखेत स्वतंत्र मायक्रो बँकिंग विभाग सुरू केला आहे. गेली अनेक वर्षे एकात्म समाज सेवा केंद्र या उपक्रमासाठी चांगले काम करीत आहे. आता नाबार्ड बँकेने पाच महिला व पाच शेतकरी अशी बचतगटाची नवी संकल्पना तयार केली आहे. संयुक्त जबाबदारी गट या नावाने हे गट ओळखले जाणार आहेत.'' यावेळी महिलांनी मनोगत व्यक्त करताना आमच्या मालाला नाबार्ड अगर सरकारने विक्रीची सोय उपलब्ध करून दिली. यावेळी बापूसाहेब पुजारी यांनी या क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या एनजीओंना अर्थसाह्य उपलब्ध करून दिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. केंद्राचे भालचंद्र बापट यांनी आभार मानले.







# स्वाभिमानीचा विजयोत्सव

▶ पान १ वरुन

स्वातंत्र्य अर्पण करू नका. याच्या आश्वासनांवर, भूलथापांवर, पैशाच्या मदतीवर एवढा विश्वास टाकू नका की त्यामुळे तो लोकशाही संस्थाचे स्वरूप विकृत करून टाकेल. ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीला आपले चारित्र्य विकून कृतज्ञ राहता येत नाही. त्याप्रमाणेच राष्ट्राला, नागरिकांना आपले स्वांतत्र्य, मतांचे स्वातंत्र्य विकून कृतज्ञ राहता येणार नाही, अलिकडेच झालेल्या जयसिंगपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून आलेल्यांनी सत्ता, पैसा व दंडूकशाहीच्या बळावर एकहाती सत्ता प्रस्थापित केली व ही विकत घेतलेली सत्ता जणू आपल्या बापजाद्यांची मालमत्ताचे आहे अशा थाटात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत हाच बदनाम जयसिंगपूर पॅटर्न वापरून तिथेही एकछत्री अंमलदार होऊ अशा अर्थाच्या वल्गना केल्या होत्या. पण त्यांचे हे सत्ता आणि पैशाचे गणित सपशेल चुकले. अमाप पैसा ओतूनही नि संपत्तीची वारेमाप उधळन करूनही मतदारांनी अगदी स्पष्टपणे स्वाभिमानीच्या बाजूने कौल दिला. व अभद्र महत्वाकांक्षा धुळीला मिळवली. शिरोळ तालुक्यात स्वाभिमानी जनता अजूनही निकोप लोकशाहीच्या बाजूनेच राहते हे पुन्हा एकवार सिध्द केले. आता पैसे घेऊन मतदान केलेल्या जयसिंगपूरच्या मतदारांनासुध्दा आपण काय केलो याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

शिरोळ तालुक्यात खासदार राजू शेट्टी यांनाच मानणारा शेतकरी वर्ग सर्वात मोठा आहे व स्वाभिमानी चा हा बालेकिल्ला अभेद्य आहे. हे या निमित्ताने पुन्हा एकदा सिध्द झाले. खासदार राजू शेट्टी यांनी व त्यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तालुक्यातील सर्वसामान्य तळागाळातल्या माणसासाठी जे केले, शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या पदरात जे लाभ चळवळीच्या माध्यमातून पाडून घेतले त्या निस्वार्थी मनोवृत्तीला दिलेली पोचपावती म्हणजे हे यश आहे. केवळ आणि केवळ स्वार्थासाठी एकत्र येणाऱ्या यड्रावकर (राष्ट्रवादी) आणि सा. रे. पाटील (कॉंग्रेस) या युतीला मतदारांनी अगदी स्पष्टपणे नाकारले आहे. आमदारकी नि खासदारकीची स्वप्ने पाहणाऱ्या नि हाय पैशातून सत्तेकडे या सामान्य माणसाला विकाऊ बनवून त्याच्या स्वाभिमानीला ठेच पोहोचवणारा पॅटर्न याही निवडणुकीत वापरण्याचा मनसुबा ठेवून वाटचाल करणाऱ्या धनदांडग्यांनी या निवडणुकीतून योग्य तो धडा घ्यायला हरकत नाही. सामान्य माणसांशी असलेली बांधिलकी काय योग्यतेची आहे. कुठल्या कुठील हेतूने ठेवलेली आहे. आपले स्वातंत्र्य हिरावून कुठल्या दावणीला बांधण्यासाठी हे बांधिलकेचे नाटक आहे. हे सामान्य माणसाने आता पुरेपूर ओळखले आहे. मतदारांनी पुढच्या निवडणुकीत मतांसाठी आपल्याला वश व्हावे आपले गुलाम व्हावे व आर्थिक सामाजिक लोकशाहीचा बटीक करावे या दुष्ट हेतूनेच ही धनदांडगी मंडळी गावोगावच्या तरूण मंडळांना न मागता वाट्टेल तशी वाट्टेल तेवढी देणगी देऊन, आश्वासने- प्रलोभने दाखवून फसवत असतात. हे तरूणतरूणींनी ध्यानात घ्यायला हरकत नाही. अशा सहेतूक मदतीपासून समाजाने सावध राहिले पाहिजे. शिरोळ तालुक्यातील तमाम मतदारांचे मनःपूर्वक अभिनंदन त्यांनी तालुक्यातील तमाम मतदारांचे मनपूर्वक अभिनंदन! त्यांनी तालुक्यातून तब्बल पाच प्रतिनिधी जिल्हापरिषदेत पाठवून आणि पंचायत समितीत आठ प्रतिनिधी निवडून आणून एक लखलखता इतिहास घडवला आहे. विजयी जिल्हापरिषद उमेदवार सावकर मादनाईक, नीता परीट, सुरेश कांबळे, सुनंदा दानोळे आणि सीमा पाटील यांचे हार्दिक अभिनंदन! तर पंचायत समितीतले अनंतमती पाटील, युनुस पटेल, वसंत हजारे, कमरूद्दीन पटेल, वैशाली देवताळे, अनिता माने, शीला पाटील आणि सुवर्णा अपराज यांनाही त्यांच्या दैदिप्यमान यशाबद्दल हार्दिक अभिनंदन! विजयाच्या या सुखावणाऱ्या किनारीला एक टोचणारे दुखरे टोकही आहे. हे विसरता येणार नाही. तळागाळातील सामान्य माणसाच्या सुखदुखःसाठी समरस होणारा आदिनाथ हेमगिरे सारखा कार्यकर्ता अवघ्या ४१ मतांनी पराभूत होतो हे शल्य पुढची पाच वर्षे सतत सतावत राहिल. याबरोबरच यशवंत प्रभावळकरांचा विजय ३४६ मतांनी हुकतो. दत्तवाडमध्ये संजय पाटीन नि शिरोळमध्ये उज्वला पाटील पराभूत होतात. या दुखाच्या यातना प्रत्येक स्वाभिमानी मनाला होतच राहणार आहेत. पंचायत समितीमध्ये ही महादेवराव धनवडे, दशरथ घाटगे, शोभा पाटील, जयश्री शिंदे, नामदेव कांबळे आणि दिग्विजय कांबळे यांचे पराभव जिव्हारी लागणारे आहेत. यातले काही तर अगदीच निसटते फरकाचे आहेत. पुढची पाच वर्षे हा पराभव पचवून विजयी सहकाऱ्यांच्या मदतीने समाज हितासाठी आपल्याला राबायचे आहे ही जाणीव विसरू द्यायची नाही. गड आला पण काही सिंह खर्ची पडले असे याचे वर्णन करता येईल. पण अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन आशा, या उक्तीनुसार स्वाभिमानीची ध्वजा नि स्वाभिमानी कार्यकर्त्यांची मान ताठच राहील, अशी प्रतिज्ञा या विजयोत्सवाच्या निमित्ताने करूया!

# सा. रे. पाटील व यड्रावकरांचा खुर्दा
# शिरोळ तालुक्यात स्वाभिमानीच

जयसिंगपूर(प्रतिनिधी): जि. प. व पंचायत सम्तीच्या निवडणुकीत स्वाभिमानी पक्षाने शिरोल तालुक्यातील काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा खुर्दा करीत पंचायत समितीवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करीत ८ जागांवर बाजी मारली. तर जि. प. पाच जागावर स्वाभिमानीच्या शिलेदारांनी बाजी मारली. दरम्यान कोल्हापूर जि.प. कोणाचा अध्यक्ष होणार हे खासदार राजू शेट्टींच्या हातात असून या निवडणुकीत ते किंगमेकर ठरले आहेत.

स्वाभिमानी पक्षाने शिरोळ तालुक्यात उदगाव, दानोळी, आलास, नांदणी व अकिवाट जिल्हा परिषदमध्ये दणदणीत विजय मिळविला. तर पंचायत समितीमध्ये कोथळी, अर्जुनवाड, गणेशवाडी, नांदणी, शिरढोण, आलास, हेरवाड व शिरोळ पूर्व या पंचायत समितीमध्ये स्वाभिमानी पक्षाच्या उमेदवारांनी विजय मिळविला. खासदार राजू शेट्टींनी केलेल्या आंदोलनामुळे तसेच खासदारकीच्या माध्यमातून केलेली विकासकामे आदी गोष्टी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या विजयाला कारणीभूत ठरल्या. त्यामुळे शिरोळ तालुका हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला असल्याचा सिध्द झालेला आहे. उदगांव जि. प. मतदारसंघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सावकार मादनाईक यांनी जि. प. च्या माजी अध्यक्षा यशोदा कोळी यांचा १९८५ मतांनी दारूण पराभव केला. सावकार मादनाईक यांना १०३०६ मते मिळाली तर विरोधी असलेल्या काँग्रेसच्या उमेदवार सौ. यशोदा कोळी यांना ८३२१ मते मिळाली. दानोळी जि. प. मतदारसंघातून स्वाभिमानीच्या सुरेश कांबळे यांनी राष्ट्रवादीच्या अशोकराव माने यांचा ४६४२ मतांनी दारूण पराभव करीत एकतर्फी विजय मिळविला. सुरेश कांबळे हे व्यवसायाने साधे पेंटर होते. त्यावरून ते थेट जि. प. मध्ये उडी मारलेली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने एका सामान्य व्यक्तीला थेट जि. प. मध्ये नेऊन बसविले आहे. नांदणी जि. प. मध्ये विकासकामांचा महामेरू असलेले प्रकाश परीट यांच्या पत्नी सौ. निता उर्फ संजीवनी परीट यांनी राजू कुरडे यांच्या पत्नी सौ. कुसुम कुरडे यांचा २४६५ मतांनी पराभव करीत एकतर्फी विजय मिळविला. आलास जि. प. मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते अजित दानोळे यांच्या पत्नी सौ. सुनंदा दानोळे यांनी अर्चना धनवडे यांचा ६९८ मतांनी पराभव करीत विजय मिळविला. अकिवाट जि. प. मध्ये स्वाभिमानीच्या सौ. सिमा पाटील यांनी सौ. राजश्री पाटील यांचा ३२४० मतांनी दारूण पराभव केला.

अर्जुनवाड पंचायत समितीमधून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वसंत आकाराम हजारे यांनी १३ मतांनी महादेव करे यांचा पराभव करीत विजय संपादन केला. गणेशवाडी मधून स्वाभिमानीच्या वैशाली देवताळे यांनी सिंधू राजमाने यांचा ५४१ मतांनी पराभव करीत विजय मिळविला. शिपोळ पूर्व मध्ये स्वाभिमानीच्या सौ. अनिता माने यांनी सौ. उज्वला चौगुले यांचा १९८ मतांनी पराभव करीत विजय मिळविला. कोथळी पंचायत समितीमध्ये येथील तरूण कार्यकर्ते श्रीकांत पाटील यांच्या मातोश्री श्रीमती अनंतमती पाटील यांनी सौ. सुजाता पाटील यांचा १४५३ मतांनी दारूण पराभव करीत सहज विजय मिळविला. नांदणीमध्ये स्वाभिमानीच्या युनुस पाटील यांनी संजय माने यांचा तब्बल १८६८ मतांनी पराभव करीत एकहाती विजय मिळविला. या विजयात युवा नेते सागर संभुशेटे यांचा मोलाचा वाटा आहे. आलास पंचायत समितीमध्ये स्वाभिमानीच्या कमरूद्दीन पटेल यांनी अफसर पटेल यांचा १४४ मतांनी पराभव केला. शिरढोण पं. स. मध्ये स्वाभिमानीच्या शिला पाटील यांनी सुजाता कोळी यांचा ६२८ मतांनी पराभव करीत विजय मिळविला. तर हेरवाड पंचायत समितीमधून स्वाभिमानीच्या सुवर्णा अपराज यांनी मंगल आनुसे यांचा १३७१ मतांनी पराभव केला. शिरोळ पंचायत समितीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आपला बालेकिल्ला असल्याचे सिध्द करून दाखविले आहे. खासदार राजू शेट्टी यांचा आंदोलनाचा परिपाक म्हणजेच शिरोळ तालुक्यातील स्वाभिमानीला मिळालेले यश आहे.

# स्टील गुऱ्हाळाने कमी वेळेत गूळनिर्मिती


कोल्हापूर : येथील प्रादेशिक ऊस आणि गूळ संशोधन केंद्राने आधुनिक गुऱ्हाळघर विकसित केले आहे. गुऱ्हाळासाठी लोखंडाऐवजी स्टेनलेस स्टीलची उपकरणे वापरून कमी वेळेत जादा उत्पन्नाचे तंत्र विकसित केले आहे.

ऊसतोडणीनंतर त्याचे सहा ते सात तासांत गाळप करणे गरजेचे असते. तोडणीनंतर जास्त कालावधी गेला तर चांगला रस मिळत नाही. परिणामी चांगला गूळ तयार होत नाही. मात्र, स्टेनलेस स्टीलच्या चरख्यामध्ये ऊस गाळपासाठी आडव्या तीन लाटांचा वापर केला आहे. चांगली गाळप क्षमता असलेले चरखे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे ऊस जास्त शिळा झाला तरीही जास्त रस मिळविण्यास मदत होते.

उसाच्या रसात फि नॉलिक द्रव्ये असतात. या द्रव्यांचा लोखंडाशी संबंध आल्यास रासायनिक क्रिया होऊन गर्द निळ्या रंगाची संयूगे तयार होतात. त्याचा गुळाच्या रंगावर विपरित परिणाम होतो. म्हणून रसाचा लोखंडाशी संपर्क कमी करण्यासाठी स्टेनलेस स्टील चरख्याचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे गूळ निर्मितीही चांगली होत आहे.

काहिलीतील पाकाचे प्रमाण १०३.५ सेल्सिअस ते १०५ सेल्सिअस आल्यानंतर काकवी तयार होते. पाकाची स्थिती ओळखण्यासाठी इलेक्ट्रॉनिक थर्मामीटरचा वापर करण्यात आला आहे. काकवीमध्ये शेंगदाणा तेल वापरल्यामुळे गुळाची प्रत चांगली ठेवली जाते. या तेलामुळे काकवीचे तापमान वाढण्यास मदत होते, शिवाय यामुळे काकवी करपण्याचा धोकाही कमी होतो. पाकाचे तापमान ११८ डिग्री अंश सेल्सिअस झाल्यानंतर काहील ऊतरवून गूळ वाफ्यात ओतला जातो. त्यानंतर पाच ते दहा किलोचे गूळ रवे तयार केले जातात.

दरम्यान, गुळाच्या रंगावरून दर ठवला जातो. त्यामुळे बरेचसे शेतकरी गुळाला गडद पिवळा रंग येण्यासाठी हैड्रॉस पावडर, वाफा पावडर, भेंडी पावडर इत्यादी रासायनिक पदार्थांचा वापर करतात. हे रासायनिक पदार्थ मानवाच्या आरोग्यास हानीकारक आहेत. या पदार्थांमुळे गुळातील गंधकाचे प्रमाण वाढते. अन्नभेसळ कायद्यानुसार गुळामध्ये सल्फ रडाय ऑक्साईडचे प्रमाण ७० भाग प्रतिदशलक्षपेक्षा जास्त असू नये. यासाठी रासायनिक पदार्थांचा वापर टाळणेच हितकारक ठरणार आहे



# उतारा घटला; गूळही आटला

कोल्हापूर : उसाचा उतारा कमी झाल्याने यंदा गुळाची आवक गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सुमारे पाच ते सहा लाख रव्यांनी कमी झाली आहे. त्यामुळे यंदा गुळाची उलाढालही घटली आहे. गुळाचा हंगाम संपत आला असला, तरी कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमधील उलाढाल १६० कोटी रुपये एवढीच झाली आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत शेतकऱ्यांना सुमारे ५० कोटींचा फ टका बसला आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हिमतीवरच सुरू असलेल्या येथील गूळ उद्योगाचा नावलौकिक जगभर पसरला आहे. यंदा मात्र एकरी उत्पादनात उसाचा उतारा कमी असल्यामुळे गुळाचे उत्पादन कमी झाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत सुमारे सहा लाखांहून अधिक गूळ रव्यांची आवक कमी झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेने गुळाचा

दर शंभर ते दीडशे रुपयांनी वाढला एवढेच समाधान गूळ उत्पादक शेतकऱ्यांना आहे; मात्र उलाढाल घसरल्याचे चित्र कायम आहे.

गेल्या वर्षी या हंगामात आजपर्यंत २८ लाख ५० हजार गूळ रव्यांची आवक झाली होती. सरासरी दर २५०० रुपये होता. यंदा आजअखेर १९ लाख गूळ रव्यांची आवक झाली आहे. सरासरी दर २६०० रुपये आहे. आवक कमी होत चालल्याने शेवटच्या टप्प्यात दर किंचित वाढले आहेत. तरीही आजपर्यंतची उलाढाल सुमारे १६० कोटी रुपयांची आहे.

## दोन वर्षांपूर्वीची तेजी

दोन वर्षांपूर्वी (२००९-१०) कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमधील गूळ बाजारपेठेत विक्रमी २५४ कोटी



रुपयांची उलाढाल झाली. त्यावेळी ३२०० रुपये असा सरासरी दर गुळाला मिळाला होता. नंतर २०१०-११ आणि यंदाही गुळाला चांगला दर मिळालेला नाही. उत्पादनातही मोठी घट झाली आहे. त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फ टका बसला आहे.

गुऱ्हाळघरांचा हंगाम अनेक वेळा मे महिन्यापर्यंतही चालला आहे. यंदा मात्र हंगाम लवकर संपेल. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंतच हंगाम संपण्याची शक्यता आहे. गुऱ्हाळघरांवर कामासाठी कर्मचारीही मिळणे अवघड झाले आहे. त्यातून बाजारपेठेचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

खरे तर कोल्हापूरची गुळाची बाजारपेठ शेतकऱ्यांनी स्वतःच्या हिमतीवर वाढविली आहे. शासनाने या उद्योगाला अद्याप एक रुपयाचीही मदत केलेली नाही. हा ग्रामीण उद्योग वाढविण्यासाठी खरे तर शासनाच्या मदतीची गरज आहे. गूळ निर्यात झोन, गूळ साठवणुक□साठी शीत□असे प्र□ वर्षानुवष□ शासनदरबारी धूळ खातच पडून आहेत.

# 'नात्यागोत्या'चे राजकारण झिडकारले!

कोल्हापूर : 'मी म्हणेन तीच राजकारणाची दिशा' या भ्रमात असणाऱ्या जिल्ह्यातील सर्वच पक्षांतील नेत्यांना मतदारांनी भानावर आणले. आपली मुले किंवा नातेवाइकांच्या प्रचारात गुंतलेल्या नेत्यांना धक्कादायक पराभव अनुभवावा लागला.

कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव नाविद मुश्रीफ , आमदार के. पी. पाटील यांचा मुलगा रणजित पाटील, बाबा कुपेकरांचा पुतण्या संग्राम कुपेकर, मानसिंग गायकवाड यांच्या पत्नी शैलजादेवी गायकवाड, 'गोकुळ'चे अध्यक्ष अरुण डोंगळेंच्या पत्नी अनिता डोंगळे, माजी अध्यक्षांचे चिरंजीव सदानंद हत्तरकी, माजी आमदार दिनकरराव जाधव यांच्या स्नुषा स्वरूपाराणी जाधव, विद्यमान सदस्य अलका शिंपी यांचे पती जयवंत शिंपी, आरोग्य समिती सभापती युवराज पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील व 'गोकुळ'चे संचालक रणजित पाटील यांना पराभवाचा मोठा झटका बसला.

नात्यागोत्याचे राजकारण अपवादात्मक मतदारसंघातच यशस्वी झाले. जिल्ह्याचे नेते बनण्यासाठी निघालेल्या कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांना कागल तालुक्यातच मतदारांनी दणका दिला. हातकणंगले तालुक्यात पक्षापेक्षा स्वतःचे महत्त्व वाढवू पाहणाऱ्या खासदार जयवंतराव आवळे व माजी आमदार प्रकाश आवाडे या दोघांनाही मतदारांनी झिडकारले. आपापल्या उमेदवाराला पक्षापेक्षा मोठे ठरवण्याचा प्रयत्न केला. त्यातून दोघांच्या वादाचा आरोप-प्रत्यारोपाचा फड चांगलाच रंगला. या दोन दिग्गज नेत्यांनी परस्परांची चिरफाड केली. मतदारांची मोठी करमणूक झाली. मतदारांनी दोघांनाही हिसका दाखवला व भाजपला जिल्हा परिषदेत प्रवेश करण्याचा मार्ग खुला झाला.

या दोघांनी पक्षावर कुरघोडीचे राजकारण केले; पण ते त्यांच्या अंगलट आले.

उमेदवारी जाहीर झाली त्यात नेत्यांशी संबंधितांचाच समावेश होता. काँग्रेस व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षात हीच स्थिती होती. उमेदवारी देताना मुलगा, सून, पुतण्या, बायको, भाचा यांना संधी दिली गेली. त्याची प्रतिक्रियाही त्याचवेळी उमटली होती; पण आपल्यापुढे कार्यकर्ते कोठे जातात या भ्रमात नेते राहिले व येळ आल्यावर जिल्हा पातळीवरचे नेते आपापल्या उमेदवारासाठी तेवढ्याच मतदारसंघात ठाण मांडून बसले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष के. पी. पाटील हे आमदार आहेत. बिद्री साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. वास्तविक जिल्हा परिषदेसाठी त्यांना कार्यकर्त्याला संधी देता येणे शक्य होते. पण त्यांनी मुलाला, मुलीला पुढे आणले. अर्थात मतदारांनी जे करायचे ते केले. मुलाला घरी बसवले. आरोग्य समिती सभापती युवराज पाटील यांनीही अनेक सत्तेची पदे भूषवली. सगळीकडे मीच या भूमिकेतून त्यांनी पत्नीला उमेदवारी दिली. कंटाळलेल्या मतदारांनी त्यांना जागा दाखवली. कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांनाही या निकालातून मोठी चापराक बसली. कुपेकरांच्या घरात आरून-फिरून उमेदवारी का, हे जाहीर विचारायचे धाडस मतदारांत नव्हते; मात्र या निवडणुकीत मतदारांनी संग्राम यांना पराभूत करून 'जरा दुसऱ्या कार्यकर्त्याला कधीतरी संधी द्या,' असाच संदेश दिला.

शाहूवाडी म्हणजे गायकवाड घराणे हे खरे. तरीही 'कितीवेळा शैलजावहिनी' हा मतदारांच्या मनातला खदखदणारा विचार मानसिंग गायकवाडांनी जाणून घेतला नाही. अर्थात त्यांना पराभूत करण्यासाठी गायकवाड घराण्यातीलच सूनबाई भाग्यश्रीदेवी पुढे आल्या व सासूबाईंना पराभूत करून गेल्या.

'गोकुळ'चे अध्यक्ष अरुण डोंगळे यांनाही एखाद्या कार्यकर्त्याच्या पत्नीला संधी देणे शक्य होते. त्यांनी आपल्याच पत्नीसाठी प्रयत्न केले. या निर्णयावर नाराज काही कार्यकर्ते प्रचारात त्यांच्याबरोबर फिरले. त्यांनी मतदान मात्र दुसरीकडेच फि रवले. 'गोकुळ'चे माजी अध्यक्ष राजकुमार हत्तरकी, माजी आमदार दिनकरराव जाधव, जयवंत शिंपी यांनाही असाच झटका बसला. भाजपचे केरबा चौगुले यांनी जिल्हा परिषदेत बांधकाम समिती सभापतीपद भूषवले होते. त्यांनीही मुलालाच उमेदवारी मिळवून काँग्रेस, राष्ट्रवादीच्या पावलावर पाऊल टाकले व पराभवाचा झटका खाल्ला.

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न गरजेचे

## खा. राजू शेट्टी

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषीसह इतर क्षेत्रात प्रगती केली असली तरीही शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व जीवनमान सुधारण्यासाठी अजून बरेच प्रयत्न करणे गरजेचे आहे हे वेगळे सांगायला नको. साधन पुरवठा यंत्रणेतील त्रुटी, कर्जाची कमतरता, विपणनाच्या पायाभूत सुविधांचा अभाव, व मध्यस्थांकडून होणारे शोषण, भूमी व पाण्यावर वाढता दबाव, अपुरे विमा संरक्षण अशा अनेक समस्या आहेत. पावसाच्या पाण्यावर संपूर्णतः अवलंबून असण्याचे प्रमाण फार जास्त आहे.

२००८ च्या अर्थसंकल्पामध्ये एकीकडे ७८ हजार कोटी रूपयांची कर्जमाफी देण्यात आली. तर दुसरीकडे औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी ३ लाख कोटी रूपयांची करामध्ये सवलत देण्यात आली. याची राजकारणात व प्रसारमाध्यमांमध्ये अजिबात चर्चा नाही. ६० टक्के लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. तर ४० टक्के लोक अन्य क्षेत्रात गुतूंन स्वःताचा कायापालट करू पाहत आहेत. ६० टक्क्यांवर लोकांवर भारत आर्थिक महासत्ता होऊ पाहत आहे. ही अजिबात कळालेले नाही. ६० टक्के लोकांना ७८ हजार कोटी रूपयांची कर्जमाफी देऊन उपकराची भाषा करीत आहेत. तर मूठभर लोकांच्या भल्यासाठी ३ लाख कोटी रूपयांची करात सवलत दिली तरीही सरकारी तिजोरीवर त्याचा अजिबात भार पडत नाही. यामुळेच ६० टक्के लोकांचा विकास घटलेला असून कृषीक्षेत्राच्या विकासाचा दर दिवसेंदिवस घटत चाललेला आहे. एकीकडे सर्वसामान्यांना कमी दरात अन्नधान्य उपलब्ध होण्यासाठी अन्नधान्यांच्या किमती कमी करत आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव मिळत नाही. शासन शेतकऱ्यांचे कधीच चांगले पाहत नाही. कार कर्ज ० टक्के दराने मिळते. मग शेतकऱ्यांना ० टक्क्यांनी कर्ज का दिले जात नाही. या कर्जासाठी नाबार्डमुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत आहे. अनुदान सरकार खात आहे. वीजेअभावी डिझेलचा वापर करावी लागतो आहे ते ही अतिशय महाग आहे. शं तात जाण्यासाठी रस्तो नाहीत. पाण्याचा पुरवठा इतका भयानक आहे की शेती करणे अतिशय कठिण झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या



होताहेत. एकीकडे बागायत शेती आहे. एकरी लाखो रूपयांचे उत्पन्न घेतले जाते. मात्र दुष्काळी टापूत पाण्यासाठी उभी पिके जळताहेत. त्यावर वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनेक पाणी योजना निधी अभावी रखडलेल्या आहेत. त्याकडे सरकारचा कानाडोळा झाल्याचे दिसत आहे. सध्याचा कृषी क्षेत्राचा विकास दर ३.४ टक्के आहे. तो ५ टक्क्यांवर जाईला का ? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शेतकऱ्यांना योग्य ती बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या शेतीमालाला योग्य तो भाव मिळेल, अशी आशा व्यक्त केली जाते. देशामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी आणण्यासाठी शेतीसाठी पूरक गोष्टी सरकारने पुरवल्यात पाहिजेत. उद्योगांना एक न्याय तर शेतीला दुसरा न्याय शासनकडून दिला जातो. विजेच्या तुटवड्यामुळे शेतकरी काहीच करू शकत नाही. मुळात देशात दिवसेंदिवस पर्जन्यमान कमी होत चाललेला आहे. त्यामुळे पाण्याची बचत अपरिहार्य बनलेली आहे. ठिंबक सिंचनाचा अधिकाअधिक वापर करणे काळाची गरज बनलेली आहे. केंद्र सरकारने शेती आणि त्यावर आधारित असलेल्या उद्योगधंद्याना कोट्यवधी रूपयांच्या निधीची तरतदू केलेली आहे. तसेच सर्व राज्यातील पणन व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. कृषि पणन व्यवस्थेमध्ये अनेक बाजार सेवांची गरज असल्यामुळे बाजार व्यवस्थेमध्ये बरेच मध्यस्थ दिसून येतात. त्यांचा खर्च आणि नफा या बाबी कोणत्याही बाजारपेठेतील शेतमालाच्या किम्मती ठरविण्याच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या ठरतात. शेतमाल हा हंगामी असतो. नाशवंतही असतो आणि तो अनेक ठिकाणी अनेक शेतकऱ्यांनी उत्पादित केला असल्यामुळे त्याच्या निर्मिती, पुरवठा व प्रकार यावर शेतकऱ्यास संपूर्ण नियत्रंण ठेवता येत नाही. म्हणून शेतमाल विक्री करताना शेतकऱ्याने अगोदर कोणता माल, किती प्रमाणात, कोणत्या स्वरूपात, केव्हा व कोठे पाठवावा

पान १० वर ▶

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न गरजेचे

▶ पान ९ वरुन

इ. बाबींचे नियोजन करून योग्य ती पावले उचलणे आवश्यक असते. शेतकऱ्यास संपूर्ण कृषी पणन व्यवस्थेची तर माहिती हवीच परंतु देशांतर्गत व देशाबाहेरील बाजारपेठेची, मागणी, पुरवठा, आवड इ. तसेच शेतमाल विक्रीचे योग्य निर्णय दृष्टोकानातून गरजेचे आहे. आपला देश जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाल्यामुळे आणि त्याचबरोबर आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरणाचा अवलंब केल्यामुळे शेतमाल विक्रीची बाजारपेठे खूपच विस्तारित झालेली आहे. कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना, आदर्श बाजार कायदा, कराराची शेती कायदा, कृषि मालासाठी वायदेबाजार आदीमुळे शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्रीसाठी विविध पर्याय उपलब्ध झालेले आहेत. मात्र यामध्ये सरकारच्या अंधाधुंदी कारभारामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

कृषि अर्थशास्त्र विषयातील संशोधनावरून असे स्पष्ट होते की कृषि पतपुरवठा वेळेवर, पुरेशा प्रमाणात व योग्य कारणासाठी झाला तर शेती व्यवसायात सुधारणा घडून येतात, त्यामुळे शेती व्यवसायात भांडवली गुंतवणूक करता येते. व त्याचबरोबर सुधारित शेती पध्दतीचा व नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादनात वाढ होते. प्रामुख्याने कृषि उत्पादन, पणन, पतव्यवस्थापन, प्रक्रिया व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, जागतिक व्यापार संघटना आदीं बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. जागतिक व्यापार संघटना १९९५ ला उदयास आली. या अगोदर गॅट( जनरल अॅग्रीमेन्ट ऑन ट्रेड अॅण्ड टेरीफ) करारातूनच जागतिक व्यापार संघटना उदयास आली. जगाच्या बाजारपेठेत आपण पाहिल्यास आपण फारच मागे दिसतो. शेती पिकली पाहिजे . शेतीचा विकास झाला पाहिजे तरच आपला देश जगात पुढे जाईल, म्हणून खेड्याकडे चला असा आवाज महात्मा गांधीजींनी दिला. मात्र या सर्व बाबी पाहिल्यास आपण फारच कमी पडत आहोत. असे जाणवते. कृषी क्षेत्रावरील अवलंबून असलेल्या व त्यावरील अर्थकारणाच्या पैलूवर प्रकाश टाकल्यास आपण या क्षेत्राचा विकास दर ३.४ टक्क्यांवरून ८ ते १० टक्क्यांपर्यंत गेला पाहिजे. यासाठी योग्य ती वापले तातडीने उचलणे आवश्यक आहे.

| विभाग | योजनागत खर्च (कोटीत) | गैरयोजनागत खर्च (कोटीत) | एकूण (कोटीत) |
|---|---|---|---|
| कृषी / सहकार | १७१२२/- | ४००/- | १७५२२/- |
| कृषी अनुसंधान आणि शिक्षा | २८००/- | २१५७/- | ४९५७/- |
| पशुपालन व दुग्ध व्यवसाय | १६००/- | ९६/- | १६९६/- |
| कृषी उपद व निर्यातामुळे मिळणारे परकीय चलन | ४१०७६/- | - | |
| कच्च्या तेलाचा आयातीचा खर्च (एप्रिल १० ते सप्टेंबर १० अखेर | २,२३६५०/- | - | |
| ग्राम विकास मंत्रालयाचा खर्च (भारत निर्माण, पंतप्रधान ग्राम सडक योजना,नरेगा) | १४०९०४/- | - | |
| प्रशासकीय खर्च | २६५३ /- | - | |

सध्यस्थितीत पाहिल्यास कच्च्या तेलावर आपला भरमसाट पैसा खर्च होत आहे. ओपेक ही संस्थाच जागतिक तेलाचा बाजारेपठ ठरवले जातात. ही संस्था कच्च्या तेलाचा जवळपास ४० टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करीत आहे. तेलावर आपल्याला ओपकवरच आपल्याला अवलंबून रहावे लागत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आपले परकीय चलन खर्ची पडत आहे. इंधनाचे दर वाढल्यास याचा विपरीत परिणाम शेती मालाच्या वाहतुकीवर होतो. दर १५ दिवसाला इंधनाचे दर बदलत आहेत. अंतिमतः कच्च्या तेलाचे दर निश्चित करणे म्हणजे काहीसा गुंतागुंतीचा गणिती प्रकास असतो. विक्रेत्या देशातील मध्यवर्ती यंत्रणा, बाजारपेठेची स्थिती आणि खरेदीदार देशाचे स्वारस्य

पान ११ वर ▶

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न गरजेचे

▶ पान १० वरुन

यासारख्या अनेक घटकांचा विचार करून ते दर निश्चित करतात. कमी जागेत जास्तीत जास्त उत्पन्न मिळवून उत्पादन घेतल्यास जास्त फायदा होईल असे साधे गणित आहे. मात्र यालाच चांगला दर देखील मिळणे तितकेच आवश्यक आहे. शेती आणि अर्थकारण याचा विचार केल्यास या दोन्ही गोष्टी नाण्याचा दोन बाजू आहेत. कृषी क्षेत्र, विशेषतः पारंपारिक शेतीमध्ये अनेक प्रकारचे धोके आहेत. पिकांना तयार होण्यासाठी लागणारा वेळ, शेतीसाठी वापरली जाणारी ऊर्जा, संसाधनाची उपलब्धता, हवामान, नैसर्गिक आपत्ती, अनिश्चित बाजार, असे अनेक प्रकारचे धोके यामध्ये संभावतात. गेल्या दशक भरात कृषि विकास दर कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ न झाल्यामुळे अन्न सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला. सरकारच्या चुकीच्या धोरणाचा फटका हा शेतकऱ्यांनाच बसत असतो. कर्जबाजारी होऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात घडत आहेत. शेतीच्या व त्यावरील आधारित असलेल्यांना वेळीच सहकार्य करणे गरजेचे आहे. नुसत्या पॅकेजच्या घोषणा करून चालणार नाही तर त्या योग्य व्यक्ती व घटकापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. कृषि क्षेत्रावर अलीकडच्या काळात लक्ष केंद्रीत केले जात असून अनेक सकारात्मक परिणामही दिसत आहेत. मात्र या वळणावर आवश्यक आहे ती, प्राधान्यक्रम व उद्दिष्टे निश्चित करून ती साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी लोकांकडे उत्तम कल्पना आहेत. उच्च दर्जाचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. हे सर्व एकत्र आणून योग्य ती कृती करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, त्यांचे कल्याण हे राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट आहे. याचा अर्थ केवळ उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यापुरता मर्यादित नाही. शेतकऱ्याची बाजारातील स्पर्धाचा सामना करण्याची क्षमता वाढविणे अया याचा अर्थ आहे. यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा, विपणन सुविधा, साधनांचा नियमित पुरवठा, कर्जाची उपलब्धता हे घटक आवश्यक आहेत आणि पायाभूत सुविधांची निर्मिती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर आणि बिगरशेती व्यवसायाचा विकास हे सर्व साध्य करण्यासाठी व्यापक अशा राष्ट्रीय दृष्टीकोनाची गरज आहे.



जयसिंगपुर : येथे रामा टी स्टॉलवर शिवजयंती साजरी करण्यात आली व सावकार मादनाईक यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी उपस्थित कार्यकर्ते.

# राजेंद्र यड्रावकरांच्या चौकशीचे आदेश

जयसिंगपूर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे स्थानिक नेते व दै. जागृत लोकनेता चे संपादक राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी चुकीची बातमी प्रसिध्द करून स्वाभिमानी पक्षाची नाहक बदनामी केल्याबद्दल त्यांची त्वरीत चौकशी करण्याचे, आदेश जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी, शिरोळ यांना देलेले आहेत. यासंदर्भात स्वाभिमानी पक्षाचे सचिव डॉ. महावीर अक्कोळे यांनी राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक, जयसिंगपूर, यांच्याकडे रितसर तक्रार करून संपादक राजेंद्र पाटील – यड्रावकर यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी केलेली होती.

नुकत्याच झालेल्या जि. प. निवडणुकीत जयसिंगपूर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे स्थानिक नेते व दै. ‡जागृत लोकनेता‡ चे संपादक राजेंद्र पाटील – यड्रावकर यांनी चुकीची बातमी प्रसिध्द करून स्वाभिमानी पक्षाची नाहक बदनामी केली. स्वाभिमानी पक्षाच्या प्रचार सिडीमध्ये घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल कोणतेही अवमानकारक वाक्य नव्हते. तसेच सात दिवसाच्या प्रचारात कोणीही यावर आक्षेप घेतलेला नव्हता. मात्र निवडणुकीच्या दिवशीच म्हणजेच दि. ७ फेब्रवारी रोजी 'स्वाभिमानी'ने केला डॉ. बाबासाहेबांचा अवमान या शिर्षकाखाली बातमी दैनिकात प्रसिध्द करून दलित समाजात प्रति वाटण्यात आल्या. वास्तविक त्या घटनेचा कोणताही संबंध नसताना ग्रामीण भागात राष्ट्रवादीची ताकत वाढावी यासाठी हे कुंभाड रचण्यात आले. तसेच खुलासा करण्यासाठी कोणताही अवधी मिळू नये यासाठी हा प्रताप राजेंद्र पाटील – यड्रावकर यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल स्वाभिमानी पक्षाला मोठे आदराचे स्थान आहे. असे असताना विधानाचा चुकीचा अर्थ काढण्यात आला. स्वाभिमानी पक्षाने दानोळी मतदार संघात दलित समाजातील एक सामान्य कार्यकर्ते सुरेश कांबळे यांना उमेदवारी दिलेली होती. त्याच्याकडे दलित मतदारांचा जाणारा ओढा पाहून राजेंद्र पाटील – यड्रावकर यांनी जाणीवपूर्वक व स्वाभिमानी पक्षाची बदनामी व्हावी व त्यांच्या मते त्यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवाराला मिळावी यासाठी यासाठी त्यांना हा खटाटोप केला. त्यामुळे त्यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केला. अशी तक्रार स्वाभिमानी पक्षाचे सचिव डॉ. महावीर अक्कोळे यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे केलेली होती. या तक्रारीची त्वरीत दखल घेऊन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, राज्य यांचेकडील आदेश क्रं. स्थास्वसं– २०११/ प्र. क्र. २५/ का. ५ दिनांक २८/१२/२०११ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर आदेशावरील सुचनेनुसार चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिलेले आहेत.

---

# वसगडेत पतंगरावांना धक्का

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संदीप राजोबा बहुमताने विजंयी

वसगडे : पलूस पंचायत समितीच्या वसगडे गणाच्या निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार संदीप धनपाल राजोबा यांनी कॉंग्रेसच्या नरसगोंडा पाटील यांचा तब्बल ११९९ मतांनी दारून पराभव करत विजय संपादन केला. यामुळे वनमंत्री पतंगराव कदम यांच्याच मतदारसंघात मोठी नाचक्की झाली आहे. तर राष्ट्रवादीचे संजय पवार तीन नंबरवर फेकले गेले.

एकतर्फी झालेल्य निवडणुकीत संदीप राजोबा यांनी वसगडे, खटाव, ब्रम्हनाळ, सुखवाडी, खंडोबाचीवाडी आदी गावांत मतांची आघाडी घेतली. कॉंग्रेस व राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी बेसुमार पैसे वाटुनसुद्धा शेतकऱ्यांनी त्यांना झिडकारले. संदीप राजोबा यांनी केलेली ऊस, दुधाची आंदोलने तसेच सांगली व तासगाव कारखान्यांची काढून दिलेली थकीत बिले आदींमुळे त्यांनी कॉंग्रेसच्या उमादवाराचा एकतर्फी पराभव केला.

# राजगोळीत शेतकऱ्याने बनवले स्वयंचलित पाचट कटिंग मशीन

चंदगड, ता. २६ : राजगोळी बुद्रुक (ता. चंदगड) येथील नागोजी भरमू पाटील (वय ४५) या शेतकऱ्याने अनुभवाच्या जोरावर रोटाव्हेटरच्या सॉफ्टला तांत्रिक जोड देऊन उसाचे पाचट कटिंग करण्याची सहज सोपी पद्धती विकसित केली आहे. केवळ सातवीपर्यंत शिकलेल्या या शेतकऱ्याने निरीक्षण आणि अनुभवाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. आधुनिकतेची कास धरलेल्या पाटील यांनी पाच वर्षापासून सरीतच पाचट कुजवण्याची पद्धत अवलंबली आहे. त्यातून पाणी, विजेची बचत झाली. मशागतीचा खर्च वाचवला. जमिनीचा पोत सुधारल्याने सरासरी उत्पन्नही वाढले आहे.

वडिलोपार्जित साडेचार एकर जमीन कसताना आधुनिक पद्धतीकडे कल होता. बागायती शेती करायची तर पाणी गरजेचे असल्याने ताम्रपर्णी नदीवरून नऊ हजार फूट पाईपलाईन टाकली. यासाठी आजऱ्याच्या जनता बँकेने आर्थिक सहकार्य केले. संपूर्ण क्षेत्रावर ऊस लागवड केली. त्यावेळी सरासरी एकरी तीस टन उत्पादन मिळत होते. त्यात वाढ करण्यासाठी पाचट कुजवण्याची पद्धत सुरू केली. क्षेत्र अधिक असल्याने खुरप्याने तुकडे करण्यावर मर्यादा होत्या. शिवारात जोंधळा मळण्याच्या मशीनचे लक्षपूर्वक निरीक्षण केले आणि त्यातून बैलांच्या साह्याने ओढणीचे पाचट कटिंग मशीन तयार केले. लोहाराची मदत घेऊन तयार केलेले हे मशीन खूपच उपयुक्त ठरले. तीन वर्षे त्याचा वापर केला. बैलजोडी विकून पॉवर ट्रेलर खरेदी केल्यानंतर हे मशीन बिनकामाचे ठरले. रोटाव्हेटरमध्ये तांत्रिक बदल करून असे मशीन करता येईल का याचे निरीक्षण सुरू झाले. तिथेही कल्पना सुचली. रोटाव्हेटरच्या सॉफ्टला एक खालच्या आणि एक वरच्या दिशेने अशी दहा दातऱ्याची खुरपी बसवून घेतली. पुढील बाजूला लोखंडी पट्टीवरही दातऱ्याची स्थीर पाने बसवली. रोटाव्हेटर सुरू केला की दातऱ्याची खुरपी सॉफ्टबरोबर गोल फिरायला लागतात. खुरप्याच्या वक्र आकारामुळे पाचट उचलून ती पुढील पट्टीवर आपटतात. खुरपे व पट्टीला दातऱ्या असल्याने ती तुटतात. एकदा सरीतून पुढे जायचे आणि पुन्हा रिव्हर्स गिअर टाकून त्याच सरीतून मागे आले की पाचटाचा अगदी भुगा होऊन जातो. सरीत तो अगदी गादीसारखे बसतो. भुगा झाल्यामुळे कुजण्याची प्रक्रिया जलद होते. यंत्र बघण्यासाठी लोकांची गर्दी आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनीही त्याचे कौतुक केले आहे.

पाच वर्षात श्री. पाटील यांच्या शेतात जमिनीचा पोत सुधारला आहे. उत्पादनातही एकरी दहा टनाने वाढ होऊन आता सरासरी चाळीस टन उत्पादन झाले आहे. रासायनिक खतावरील खर्च निम्याहून अधिक कमी झाला असून, ही मात्रा कमी करीत भविष्यात पूर्णतः रासायनिक खंत बंद करण्याचा मानस आहे. दरम्यान, एका सरीत पाचट ठेवल्याने मशागतीचा खर्च निम्यावर आला. साडेचार एकराची मशागत करण्यासाठी दोन महिलांना अगदीच दोन ते तीन दिवस पुरत असल्याचे श्री. पाटील यांचे म्हणणे आहे. पाण्याची पर्यायाने विजेचीही बचत झाली. कृषी विभागाचे मनोहर पाटील, एम. डी. पाटील, एस. ए. आगा, एस. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाने शेतीमध्ये प्रगती साधण्याचा त्यांचा प्रयत्न सुरूच आहे.

## फक्त अडीच हजारांचा खर्च

स्वयंचलित पाचट कटिंग मशीन तयार करण्यासाठी लोहाराची मजुरी आणि लोखंड मिळून खर्च आला केवळ अडीच हजार रुपये. होय १ लाख ४२ हजारांचा पॉवर ट्रेलर आणि त्याच्या रोटाव्हेटरला दातऱ्याच्या खुरपी, करवतीची जोड देऊन तयार झाले पाचट कटिंग मशीन. एक एकरातील पाचट कटिंग करण्यासाठी चार तास आणि चार लिटर डिझेल लागते.

# शेती व्यवसायाला नवी दिशा देणारे
# हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर



पारंपारिक पद्धतीने शेती व्यवसाय करण्याची जडलेली सवय आणि शेतीच्या प्रगत ज्ञानविज्ञान तंत्रज्ञानाबाबतची अकारण भीती, यामुळे देशातील शेतकरी वर्ग त्यांच्या शेतीला शेतीउद्योग व्यवसायाचे ठोस उत्पन्नाचे निश्चित स्वरुप देऊ शकत नाहीत. नवीन विज्ञान-तंत्रविज्ञानाबाबत भीती वाटणे जरी साहजिक असले तरी त्यात अशी कोणतीही अवघड आणि जमणारच नाही, अशी कोणतीच बाब नाही. हाच धागा धरून हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरने शेतकऱ्यांच्या मनातील शंका, भीती आणि गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न गेली दोन वर्षे केले आहेत. त्यात मिळालेले यश पहाता, शेतकऱ्यांमधील आत्म विश्वास दृढ करणे आणि उद्योगाच्या धर्तीवर शेती करण्यास त्यांना योग्य तेच मार्गदर्शन, मदत आणि प्रोत्साहन देण्याचे कार्य हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये प्रगतिपथावर आहे. करता करता शिका, अशा वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षण पद्धतीमुळे या केंद्राचा नावलौकिक केवळ गेल्या दोन वर्षात देशातील २२ राज्ये तसेच पाकिस्तान, भूतान, श्रीलंका, नेपाळ अशा शेजारी राष्ट्रांच्या सीमा ओलांडून थेट फ्रान्सपर्यंत जाऊन पोहचला आहे. परदेशातूनही शेतकरी या केंद्रात प्रशिक्षणासाठी येत आहेत.

तीन वर्षापूर्वी, ऑक्टोबर २००३ मध्ये हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमधील प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. आशिया खंडातील एकमेव असलेल्या या केंद्रातील प्रशिक्षणाला सुरुवातीपासूनच मोठा प्रतिसाद मिळू लागला. २२ राज्यातील २५०० हून अधिक जणांनी येथील प्रात्यक्षिकांवर आधारित निवासी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. त्यात २४५ महिला प्रशिक्षणार्थी होत्या.ही विशेष नोंद घेणारी बाब ठरली आहे. निरक्षर शेतकऱ्यांनीही प्रशिक्षणात सहभागी होऊन जो उत्साह दाखविला आणि पारंपारिक शेती पद्धतीला नवीन तंत्रज्ञानाची जोड देण्याचे पाऊल उचलले. ते पाहता या केंद्राचे कार्य योग्य दिशेने सुरू असल्याची पावती मिळते.

संपूर्ण देशातील मिळणाऱ्या प्रतिसादाचे श्रेय येथील वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षण पान १५ वर ▶

**पिक-पाणी**

**डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले**
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५११. मो. ९९२२७७२८१५

# शेती व्यवसायाला नवी दिशा देणारे
# हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर

▶ पान १४ वरुन

आणि प्रात्यक्षिकांवर आधारित मार्गदर्शन पद्धतीला जाते. फुलशेती किंवा हरितग्रहातील शेतीसाठीची सर्व प्रकारची यंत्रसाधने, सामुग्री प्रत्यक्ष हाताळण्यास/वापरण्यास मिळाल्याने प्रशिक्षणार्थींना त्याबाबतची खात्री पटली आहे. हरितगृहाच्या उभारणीपूर्व तंत्रज्ञानापासून ते प्रत्यक्ष उभारणी, देखभाल, पीक उत्पादनाचे विज्ञान आणि शेवटी व्यापार व्यवसायाचे व्यवस्थापन अशा महत्वाच्या प्रत्येक टप्प्यांची माहिती अभ्यासक्रमात समाविष्ठ केली आहे. एकाच छत्राखाली हरितगृह प्रकल्पांची माहिती आणि मार्गदर्शन मिळत असल्याने शेतकऱ्यांचा आणि शेती उद्योगात येऊ इच्छिणाऱ्यांचा मोठा प्रतिसाद केंद्राला मिळतो आहे. शेजारी राष्ट्रांपैकी पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ देशातील कृषी विभागाकडूनही अशा प्रशिक्षणासाठी मागणी आली आहे.

पीकनिहाय अभ्यासक्रम आणि विशिष्ट पिकासाठी पूर्ण स्वतंत्र अभ्यासक्रम देण्याची सुविधा सुरू केल्याने यास गटनिहाय प्रशिक्षणार्थींचा मोठा प्रतिसाद मि ळतो आहे. गुलाब, जर्बेरा, कार्नेशन ऑर्किड आणि ॲंथ्युरिअम या फुलांच्या पिकांचा त्यात समावेश आहे. रोपनिर्मिती, अनिवृध्दी, रोपवाटिका व्यवस्थापन, फळे व भाजीपाला पिकांची लागवड, शोभिवंत झाडांच्या रोपांची निर्मिती, व्यवसाय तसेच अशा व्यापक विषयांना अभ्यासक्रमांच्या व प्रशिक्षणाच्या नियोजनात स्थान देण्यात आले आहे. प्रकल्प उभारणीसाठीही येथील तज्ज्ञ हे प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष मदत करीत असतात. त्यामुळे अनेक लहान मोठे प्रकल्प प्रशिक्षणार्थींनी उभे केले आहेत. केंद्राचे संचालक डॉ. सुरेश धुमाळ यांनी शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व क्षमतेनुसार अभ्यासक्रमांचे केलेले नियोजन दोन वर्षात यशस्वी ठरले आहे. संस्थेचे अध्यक्ष तसेच राज्याचे पणनमंत्री श्री हर्षवर्धन पाटील यांनी या केंद्राचा उपयोग जास्तीतजास्त लोकांना व्हावा आणि शेतीच्या गरजा भागविल्या जाव्यात म्हणून सतत सक्रिय राहून मार्गदर्शन केलेले आहे. वैयक्तिक लक्ष घातल्यामुळेच या केंद्राचा उपयोग व्यापक आणि गतीमान झाला आहे. उद्यान विद्येतील जे जे काही नवं आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असेल ते ते सर्व हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये सुसज्ज असावे, म्हणून हर्षवर्धन पाटील यांनी घेतलेल्या आग्रही भूमिकेमुळे या केंद्रात हवामान अंदाजाचा वेध घेणारी उच्च क्षमतेची वेधशाळा उभारण्याचे काम सुरु आहे. शालेय आणि महाविद्यालयीन (कृषी, वैद्यकीय, आयुर्वेदिक, होमि ओपॅथी इ.) विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींची पद्धतशीर माहिती व्हावी आणि लहान वयात त्यांच्यात शेतीची आवड

पान १६ वर ▶

# शेती व्यवसायाला नवी दिशा देणारे
# हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर

▶ पान १४ वरुन

निर्माण व्हावी म्हणून ट्रेनिंग सेंटरतर्फे विद्यार्थ्यांना विनामूल्य माहिती दिली जाते.

फूलशेती प्रशिक्षण कार्यक्रमात महिलांच्या हिरीरीने सहभागी होण्याच्या घटनेची नोंद घेत महिलांसाठी फीमध्ये ५५ टक्के विशेष सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महिला बचत गट, महिला मंडळे, महिलांच्या संस्था किंवा तत्सम गटांना आता प्रशिक्षण घेणे अधिक सोपे व फायद्याचे ठरणार आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी श्री. पाटील यांच्या भूमिकेचे ग्रामीण भागातून जोरदार स्वागत होत आहे. नजिकच्या काळात हार्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये दीर्घ मुदतीचे शासकीय मान्यतेचे प्रगत प्रशिक्षण कार्यक्रमप्रगत प्रशिक्षण कार्यक्रम तसेच गटनिहाय किंवा कार्पोरेट सेक्टरसाठी त्यांच्या गरजेप्रमाणे हवा तो विशिष्ट विषयांचा स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित करून त्यांचे प्रशिक्षण देण्याचा श्री. हर्षवर्धन पाटील यांचा मानस आहे.

मिळालेला मोठा प्रतिसाद पाहता, सेंटरने आता आपल्या कार्याची व्याप्ती वाढविली आहे. टिश्युकल्चर अभ्यासक्रमांचा आता नव्याने समावेश केला आहे. उती संवर्धन (टिश्युकल्चर) तंत्रज्ञानाचे वाढते महत्व पाहता हा अभ्यासक्रम अनेक दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. रोपांच्या निर्मितीसाठी वापरात येणाऱ्या पारंपारिक पद्धतीत गुणवत्तेच्या दृष्टीने अधिक त्रुटी आहेत. त्या दूर करून उच्च दर्जाची, अधिक उत्पादने देणारी आणि रोगांच्या प्रादुर्भावाला बळी न पडणारी सक्षम रोपे तयार करण्याचे सामर्थ्य टिश्युकल्चर तंत्रात आहे. बिया किंवा शास्त्रीय फांद्या, खोड, मुळे इत्यादी पासून तयार केल्या जाणाऱ्या रोपांपेक्षा टिश्यु कल्चर पद्धतीने तयार केलेली रोपे खात्रीने भरीव व दर्जेदार पीक देतात. त्यासाठी लागणारा कालावधी खूप कमी असतो आणि लहान जागेत रोपांची निर्मिती करता येते. रोप निर्मितीसाठी वापरात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा खर्च जास्त असला, तरी त्यापासून मिळणारे फायदे पाहता शेतकऱ्यांची वाया जाणारी मेहनत, खर्च यांची मोठी बचत होते. भरघोस उत्पन्न आणि उच्च दर्जा प्राप्त करता येत असल्याने टिश्युकल्चर शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले आहे. टिश्यु कल्चरद्वारे व्यावसायिक धर्तीवर रोपनिर्मिती करण्याचा स्वतंत्र जोड होती व्यवसाय पूरक उत्पन्नासाठी उपयुक्त सिद्ध झाला आहे. हे सर्व लक्षात घेऊन हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरने प्रशिक्षणाबरोबर या सुविधेचा उपयोग व्यवसायिक रोप निर्मितीसाठीही करण्याचे योजले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना या केंद्रातून खात्रीची रोपे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. शोभिवंत फुलांची रोपे, भाजीपाला आणि फळांच्या रोपांची निर्मिती त्याद्वारे करता येते. शंभराहूनही अधिक जातीच्या अशा वनस्पतींची रोपे या तंत्रज्ञानाद्वारे तयार करता येतात. हरितगृहातील पिकांच्या लागवडीसाठी अशी रोपे म्हणजे खात्रीची, दर्जेदार भरपूर उत्पन्न देणारी ठरतात. केंद्रातील या सुविधेचा व्यापक विस्तार पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.